लोकमत

# वेकोलिचा आयआयएम नागपूरसोबत करार

नागपूर : वेकोलीने ७ फेब्रुवारीला नागपुरातील कंपनीच्या मुख्यालयात त्यांच्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी आयआयए नागपूरसोबत



सामंजस्य करार केला. वेकोलिचे महाव्यवस्थापक (एचआरडी) नरेंद्र कुमार आणि आयआयएम, नागपूरचे संचालक बायमराया मैत्रे यांनी अध्यक्ष, सहव्यवस्थापकीय संचालक मनोज कुमार आणि संचालक (कार्मिक) डॉ. संजय कुमार यांच्या उपस्थितीत सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. २०२३ - २४ या वर्षासाठी वेकोलीच्या कार्यकारी अधिकाऱ्यांना कार्यकारी विकास प्रशिक्षण देण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. हे प्रशिक्षण आयआयएम, नागपूरच्या विस्तीर्ण कॅम्पसमध्ये आयोजित केले जाईल. येथे वेकोलिच्या अधिकाऱ्यांना त्यांची व्यवस्थापकीय कौशल्ये सुधारून कॅम्पस जीवन पुन्हा जगण्याची संधी मिळेल. या प्रशिक्षणामुळे अधिकाऱ्यांना नेतृत्व, निर्णय घेणे, विश्लेषणात्मक क्षमता इत्यादी क्षेत्रांमध्ये कौशल्ये सुधारण्यास मदत होईल. यामुळे कामाच्या ठिकाणी उत्पादकता, तर वाढेलच पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होणार आहे.